. सं. ठाणें
REFBK-0004253
REFBK-0004253




किंमत ८ आणे ] [ गं. रा. साने.

# वायकांचीं नवीं गाणीं.

( भाग १ ला )

रचणार—

**श्री. गंगाधर रामचंद्र साने, बी. ए. बी. टी.**

REFBK-0004253

REFBK-0004253

(... चे स्वाधीन.)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
8253

सन १९३०

किंमत ८ आणे.

—मुद्रक व प्रकाशक—
रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

# रचणाराचें हृद्गत !

" जीवितोद्धार ग्रंथमाले "च्या ज्या अष्टदलात्मक पुष्पांचा उल्लेख आमच्या "मुलांच्या मार्गदर्शकां" त आला आहे, त्यांतील स्त्रीजातिविषयक कर्तव्यासंबंधीं असणारे आमचे विचार आम्ही सविस्तर व स्वतंत्र गद्यग्रंथरूपानें यथाकाल आमच्या वाचकभगिनींपुढें मांडणारच होतों; पण तेच विचार आज थोडक्यांत पद्यरूपानें मांडण्याची संधी चित्रशाळेचे होतकरू प्रकाशक श्री. वासुकाका व श्री. शंकरराव जोशी या बंधुद्वयांनीं आज आम्हांस आणून दिली, याबद्दल आम्ही त्या उभय-बंधूंचे फार आभारी आहोंत.

बायकांचीं गाणीं म्हटलीं कीं, केवळ देवादिकांचीं व फारतर, "नाहिं मनींची हौस पुरली" असें म्हणून लग्नांतल्या पायघड्यावरून मिरविणें व भोजन आणि न्हाणीं यांच्यावांचून जीव उदास होण्याचींच बहुशः दृष्टीस पडतात ! त्या-पलीकडे सांसारिक, सामाजिक, व स्वदेश, स्वधर्म, स्वराष्ट्रविषयक कांहीं कर्तव्यें आपणावर आहेत व तीं नीट रीतीनें बजावल्यावांचून त्या ऋणांतून आपणा स्त्रियांची-सुद्धां सुटका नीट रीतीनें होणार नाहीं, ह्याची जाणीव फारच थोड्या स्त्रियांचे ठायीं दृष्टीस पडते. तेव्हां तशा तऱ्हेची जाणीव माझ्या लक्षावधि भगिनींपैकीं प्रत्ये-कीच्या ठायीं थोडीबहुत तरी जागृत व्हावी, ह्या सदिच्छेनें प्रस्तुत अल्पसा प्रयत्न केला आहे. त्यास चित्रांची जोडहि जागोजाग दिली आहे. सुंदर रंगीत चित्रानें त्याचें मुखपृष्ठ शोभिवंत केलें आहे. एकंदरींत, अंतर्बाह्य रुचकर असा हा मेवा बनविण्याचा माझ्याकडून मी प्रयत्न केला आहे. तो कसा काय साधला आहे, हें पहाण्याचें काम अर्थात् भगिनीवर्गाचें आहे. त्यांना तो आवडल्यास मी आपणास धन्य समजेन. कारण—

**"आपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् ।**
**बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः ॥ "**

ही कविकुलगुरु कालिदासाची उक्ति प्रसिद्धच आहे, हें आमच्या सुशिक्षित भगिनी-वर्गापैकीं संस्कृतज्ञ भगिनींना तरी वेगळें सांगावयास नकोच.

५३९ सदाशिव पेठ, पुणें शहर.
ता. २५-१०-३०.

सर्वांचा नम्र,
गं. रा. साने.

# अनुक्रमणिका.


| गाणें | पृष्ठ | गाणें | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ मुलगी ... ... | १ | १९ ईश्वरभक्ती ... ... | २२ |
| २ तरुणी ... ... | १ | २० भूतदया .... ... | २४ |
| ३ वधू ... ... | २ | २१ हुंडा ( मुलीचा ) ... | २४ |
| ४ नूतनविवाहिता ... | ४ | २२ हुंडा ( मुलाचा ) ... | २५ |
| ५ सून ... ... | ५ | २३ लग्नांतली भांडणें ... | २७ |
| ६ पत्नी ... ... | ६ | २४ प्रीतिविवाह ... ... | २७ |
| ७ सवत ... ... | ७ | २५ प्रौढविवाह ... ... | २८ |
| ८ माता ... ... | ८ | २६ विधवा ... ... | २९ |
| ९ मालकीण ... ... | १० | २७ शिक्षण ( संवाद ) ... | ३१ |
| १० भगिनी ... ... | ११ | २८ गोरक्षण ... ... | ३४ |
| ११ सासू ... ... | १३ | २९ स्वदेशी ... ... | ३६ |
| १२ नणंद ... ... | १५ | ३० देशाभिमान ... ... | ३६ |
| १३ जाऊ ... ... | १६ | ३१ धर्माभिमान ... ... | ३८ |
| १४ मैत्रीण ... ... | १६ | ३२ भाषाभिमान... ... | ४० |
| १५ खरा मित्र ... ... | १७ | ३३ अस्पृश्यतानिवारण ... | ४२ |
| १६ टापटीप, दक्षता व स्वच्छता | १८ | ३४ शुद्धिकरण ... ... | ४३ |
| १७ ज्ञानमार्ग व वेळेचा सदुपयोग | २० | ३५ ग्रामसेवा ... ... | ४४ |
| १८ व्रतें, वैकल्यें व दानधर्म ... | २१ | ३६ प्रभुप्रार्थना (शेवटची) ... | ४५ |


टीपः—पान १८, ओळ ६ वी, इ च्या प्रारंभीं " परी पराभव " हे शब्द पडण्याचे राहिले आहेत. ते घालून ती ओळ वाचावी.

४२५३
ता. क्र.
६६८९
9०७८
सं. काव्य
२२.११.३२
ता.

# बायकांचीं नवीं गाणीं.

## ( १ ) मुलगी.

चाल— ( निज बाळारे. )

तव जन्म मुली हर्ष मनाला देई । नच दुःख वाटतें बाई !॥धृ.॥
दिसमास तुझी वाढ जगीं होऊं दे । पितरांस हर्ष देऊं दे ! ॥
आइबापांचे ऐकुनि हितकर बोल । तूं त्याचप्रमाणें चाल॥
तव बालवयीं झटुनी शिकुनी घेई । हें पुन्हा न वय गे येई ! ।
घरकाम शिकुनि तरबेज ।
होण्यास करी दररोज ।
सवयिनें सुलभता सहज ।
त्यामाजि तुला प्राप्त खचित गे होई । जरि आळस सोडिसि बाई!॥१॥

## ( २ ) तरुणी.

चाल- ( नृपममता० )

तरुणिनो तुम्हांसी आतां ।हितकर मी वदतों वार्ता ।खचितची ॥धृ.॥
मजकडे लक्ष जरि द्याल । बिनमोल आयु होईल !। यापुढें ।
तारुण्यभरानें फुलली ! । तनुलतिका तुमची सगळी ! । सत्वरी ।
म्हणुनिया विनय तुम्हि धरणें । सच्छील सदा आचरणें!। जपुनियां ।
किति मोह ।
तसे संमोह ।
आणिक व्यामोह ।
जगीं या पडति, जगीं या येती । वारुनी तयांना पुढती । चालणें ॥१॥

संसारिं एकदां पडतां । मग कुठली शिक्षणवार्ता ? । ती तुम्हा ।
म्हणुनिया झटुनि या समया । ज्ञानामृत तें प्राशाया । सिद्ध व्हा!।
निज भावि पतीला तुष्ट । करण्यास्तव शिकणें इष्ट । बहु कला!।
घरकाम ।
आणिक व्यायाम ।
तसें प्रभुनाम ।
सकल हें करणें, सकल हें घेणें । त्यामुळें सजुनिया दिसणें ! ।
आयु हें ॥ २ ॥
नच विसरा परि देशाला । आणिक त्या प्रियधर्माला । आपुल्या ।
देशधर्मसेवा करण्या । सिद्ध असा तनु मन देण्या । शक्य तें ।
देशीच माल घेईन । निजधर्मांतचि राहीन । निश्चयें ।
शपथ ही ।
मनीं प्रत्यही ।
करुनिया सही ।
पाळणें तिजला, जागणें तिजला । सफल हा जन्म तरि झाला! ।
ओळखा ॥ ३ ॥

---

## ( ३ ) वधू.

### चाल–( चंद्रकांत राजाची० )

मंगलाष्टकें सुरू जाहली मंगल होण्याला ! ।
मंगलाक्षता जन फेकीती मंगल करण्याला ! ॥ १ ॥
" शुभमंगल सावधान " ऐसें म्हणुनि जागृतीला ।
कर्तव्याच्या तुझ्या देति गे तुला वागण्याला ! ॥ २ ॥
सावध करिती ब्रह्मवृंद हे तसे आप्तइष्ट ।
कारण मध्यें धरिला आहे तो अंतरपाट ! ॥ ३ ॥



पट परि होउनि क्षणांत दुरि गे अंतर संपेल ।
सुमनमाळ निज करिंची पतिच्या गळां घालशील ! ॥ ४ ॥
वाद्यघोष कडकडाट मोठा टाळ्यांचा नाद ! ।
तंडुलकणवर्षाव तुजवरी चहुकडुनि होत ! ॥ ५ ॥
कुंकुमचर्चित मंगलाक्षता मंगलवाद्यें तीं ! ।
शुभमंगल तव होण्यालागीं द्विजगणही वदती ॥ ६ ॥
परि निज मंगल करणें आपुल्या स्वाधीनाचि मुख्य ।
जरि निज पतिशीं अपुलें झालें पूर्ण असें सख्य ! ॥ ७ ॥
निजनामापरि निजस्वभावा विसरुनि जाई तूं ।
गंगेपरि निज भर्तृसागरीं मिळणिं न धरि किंतू ॥ ८ ॥
तरिच खरें ' शुभमंगल ' तव तें होईल गे बाळे ! ।
बोध असा हा हृदयीं ठेवी जपुनी वेल्हाळे ! ॥ ९ ॥

---

## ( ४ ) नूतनविवाहिता !

### चाल–( किति विशाल तट हे० )

बघ विवाह तव जाहला । म्हणुनिया अजी चांगला ।
धरि कर्तव्याचा भला । मार्ग हा ! । सुखास देइल तुला ! ॥
त्या सुखास कुठली तुला ? । मार्ग हा । सुखास देइल तुला! ॥ १ ॥
तव श्वशूर सासू तशी । सेवुनी तयांना खुषी ॥
कर झटूनिया दिनानिशीं । मार्ग हा० ॥ २ ॥
दिर नणंद जावा तशा । जरि विरुद्ध जातिल अशा ॥
वश करी वचें गोडशा ! । मार्ग हा० ॥ ३ ॥
निजपती तुझें वैभव ! । तें तरुनि नेतें भव ! ॥
तूं तया प्रथम तोषिव ! ॥ मार्ग हा० ॥ ४ ॥

तव हितार्थ कुणि बोललें । कटु तुला प्रथम वाटलें ॥
तरि स्वभाव उजळिल भलें ! । मार्ग हा० ॥ ५ ॥
उल्हसीत राहीं सदा ! । ती खरीच मनसंपदा ॥
मग सुखा न कमती कदा । मार्ग हा० ॥ ६ ॥
प्रभुजिला मनीं आठवी ! । निजहृदीं तया सांठवी ! ॥
तो हरील दुःखें मवीं ! । मार्ग हा० ॥ ७ ॥
या वचास विसर न कधीं ! । लक्ष दे तयातें आधीं ॥
मग प्रशंसितिल तुज सुधी ! । मार्ग हा० ॥ ८ ॥

---

## ( ५ ) सून.

चाल—( भूपति खरें तें वैभव० )

सुन जाहलसि तूं आजपासुनी बाळे ! ।
तव सासु पहा किति प्रेमळ ही वेल्हाळे ! ॥
तव श्वशुर तसा तो उदारहृदयी आहे ! ।
काळजी तुझी जो निशिदिनिं मानासें वाहे ! ॥
हीं दोन दैवतें म्हणुनि सेव्य गे तुजला ।
संतुष्ट करीं त्या निजसेवेनें अतुला ! ॥
आज्ञेंत तयांच्या सदैव राहुनि आणी ।
स्वर्गास खालती, लाजिव ती इंद्राणी ! ॥
जरि तुला क्वचित् कटुबोला । ऐकणें ।
जाहलें प्राप्त गे बाळे ! । साहणें ।
तरि तयास गिळुनी जाई ! । सन्मनें ।
नच खंड पडूं दे सासुश्वशुरसेवेला ! ।
त्यामुळेंच जगतीं सून मान्य सकलांला ! ॥ १ ॥

हें व्रत चालविलें सावित्रीनें पाही ।
किति झटुनि वनीं दैवतास सेवित राही ॥
त्या वृद्ध अंध श्वशुरास तसें सासूला ।
किति तुष्ट करी ती करुनि गोड सेवेला ! ॥
त्यामुळेंच साध्वी नाम पावली जगतीं ।
किति धन्य होउनी गाजतसे तत्कीर्ती ! ॥
जानकी, द्रौपदी अशीच करिती सेवा ।
म्हणुनिया अजुनि जन गाति तयांच्या नांवा ! ॥
यापरी कितिक सुनबाई । जाहल्या ।
निज गुणकीर्तीनें पाही ! । शोभल्या ।
त्या अखंड प्रभुपदिं लीन । राहिल्या ।
तैशीच वाग तूं आजपासुनी बाळे ! ।
तव कीर्तिरवानें भरेल जग मग सगळें ! ॥ २ ॥

---

## ( ६ ) पत्नी.

चाल—( श्रीक्षेत्र कृष्णातिरी० )

पत्निनों,तुम्हासीं अता, सांगतों कथा, लक्ष झणि द्यावें, लक्ष तुम्हि द्यावें
घेउनी बोध मग स्वर्गसुखा भोगावें ! ॥ ध्रु० ॥
निजपती, आपुला देव, हाच मनिं भाव, दृढधरा तुम्हि,दृढधरा तुम्ही ।
त्यामुळेंच जगतीं होइल कीर्ती नामी !॥
देवास, आवडे अती, तेंच निजमती, लावुनी करणें, लावुनी करणें ।
पतिरूप प्रभूचें प्रेम तयानें जडणें ! ॥
भवसागर, दुस्तर फार, परी तो पार, होउनी मोक्ष, होउनी मोक्ष ।
निश्चयें मिळे जरि पतिसेवेसीं दक्ष ! ॥
हीं नांव सहज तारिल, दुःख वारिल, सर्वही तुमचें, सकलही तुमचें ।

जरि भाव धरोनी आश्रयाल तिस साचें ॥
दीपास प्रभा केव्हांही, सोडिना ! ।
मेघास सोडुनी वीज, राहिना ! ।
गंगेस उदधिची एक, भावना ! ।
सागरीं, मिळुनियां पुरीं, वसे भीतरीं, तशा पतिलागि, तशा पतिलागीं ।
होउनी एकजिव रहा तुम्ही सौभाग्यीं !॥ १ ॥
ती पहा, जानकी कशी, अहा! दिननिशीं, सेविते पतिला,सेविते पतिला!।
सोडुनी सुखा पतिसवें वास वनिं केला ! ॥
द्रौपदी, सती ती तशीं, सुख न मुळें तिशी, तरी भर्त्यास, तरीं निजपतिस।
देऊनि सौख्य, त्यासवें करी वनवास ! ॥
सावित्रिकथा तुम्हास, ठाउकी खास, असेलचि पुरति, असेलचि पुरती ।
वटपूजन दर वरुषास करितसा सुमती ! ॥
पतिसवें, वनीं राहुनी, सौख्य सोडुनी, एकजिव झालि, एकजिव झाली ।
सुखदुःखीं त्याच्या मिळोनियां ती गेली ! ॥
निजपतिशी तुम्ही तैशा, एक व्हा ! ।
वृक्षास वेल नच सोडी, दाखवा ! ।
मग पार न राहिल जाणा, वैभवा ! ।
हा बोध, मनीं दृढ धरा, सुखें मग तरा, भवाचें पाणि, भवाचें पाणी ।
ही एकच नौका साह्य तुम्हां निर्वाणीं ! ॥ २ ॥

——:०:——

## ( ७ ) सवत.

चाल– ( उद्धवा शांतवन० )

येउं नये, आली सवत । तरि तिजशीं मिळुनि जावें ! ।
पतिप्रेमा वंचित होणें । निज कौशल्यें टाळावें ।
भगिनींसम लेखुनि तिजशीं । ‘ सवतीवर प्रेम करावें ’ ! ।

दुष्यंतगृहासी जातां ।
कण्वानें हो निजदुहिता ।
बोधिली याच कीं अर्था ।
मस्तकीं वास गंगेला ! । अंकावरि पार्वति व्हावें ! ॥ १ ॥

द्रौपदी सुभद्रा एका । अर्जुनास करिती तुष्ट ! ।
परि वितुष्ट मुळेंही नव्हतें । दोघिही साधिती इष्ट ।
किति सहस्र नारी देखा । कृष्णानें वरिल्या स्पष्ट ।
परि द्वैतभाववसतीला ।
नच थारा त्यांनीं दिधला ! ।
भगिनींसम राहाति सकला ।
त्यापरी तुम्हीं राहोनी । निज उन्नतींस साधावें ! ॥ २ ॥

बोध हा मनीं दृढ ठेवा । कल्याण त्यांत हो तुमचें ।
नातरी नाश किति होई । वर्णवे न मजला वाचें ।
मंथरा कलीची अंगीं । शिरुनिया कैकयी नाचे ! ।
मागते पतिस वरदान ! !
बैसली हट्ट घेऊन ।
ओढवलें त्याचें मरण ! ।
यापरी दुःख सकलांला । भगिनिनो, तुम्ही नच द्यावें !॥३॥

---

## ( ८ ) माता.

चाल—( आनंदकंद ऐसा० )

पुण्येंच प्राप्त होई ! । ती थोर मातृपदवी ! ॥ ध्रु० ॥
जन्मास घालुनीया । जगतांत आणुनीया ।
बाळास पूर्ण सजवी । ती थोर मातृपदवी ! ॥ १ ॥



‘ रशना हर्तीं जियेच्या । उद्धार ती जगाचा ! । ’
करणार सत्य भावीं । ती थोर मातृपदवी ! ॥ २ ॥
निज ओळखोनि स्थान । करि योग्य बोध जाण ! ।
जगतांस नित्य नमवी । ती थोर मातृपदवी ! ॥ ३ ॥
पय पाजितां मुलांना । शिकवीत गोष्टि नाना ।
हृदयांत पूर्ण ठसवी ! । ती थोर मातृपदवी ! ॥ ४ ॥
गर्भांतही जियेच्या । संस्कार होय साचा ।
जीवास एक जिववी ! । ती थोर० ॥ ५ ॥
देशास उद्धराया ! । धर्मास तेज द्याया ! ।
वीरास मार्ग दावी ! । ती थोर० ॥ ६ ॥
‘क्षण एक तेज दावा ! । अरिनेत्र पूर्ण दिपवा !’ ।
विदुला असेंच शिकवी । ती थोर० ॥ ७ ॥

'सर्पांस ठेंचण्याला ।' कुंती वदे मुलांला ! ।
समरास सिद्ध करवी ! । ती थोर० ॥ ८ ॥
'अपमानसूड घेण्या । निज राज्य सर्व करण्या ' ।
शिवबास माय पढवी ! । ती थो० ॥ ९ ॥
जगिं थोर थोर झाले । ठेवोनि कीर्ति गेले ! ।
त्या तेविं माय बनवी । ती थोर० ॥ १० ॥
चित्तांत हें धरावें । तैसेंच आचरावें ।
माते, तुलाच विनवी ! । ही थोर० ॥ ११ ॥

---

## ( ९ ) मालकीण.

### चाल—( तुम्हि थेंराचे अहा० )

मालकीण जाहलीस गृहिची, वैभवराशी पादिं लोळे ! ।
तरी त्यामुळें गर्व बाधुनी, धुंद होऊं दे नच डोळे ! ॥ ध्रु० ॥
येति घरीं तत्र पहीपाहुणें, सर्वांशी विनयें बोल ! ।
आप्तइष्ट वा सगेसोयरे, पारखिती गे तव मोल ! ॥ १ ॥
क्षणभंगुर तें आहे वैभव, दोन दिसानें जाइजणें ! ।
परि गर्वांतिल उद्धट भाषा, शक्य न विसरुनि कधिं जाणें ! ॥ २ ॥
यालागीं विनयासि धरावें, नम्रवाणिनें बोलावें ! ।
लवणें भोजन, तसेंच भाषण, निज विनयानें खुलवावें ! ॥ ३ ॥
फलभारानें नम्रच होती, वृक्ष पहा हे तुजभवतीं ! ।
जलभारानें जलद तसे हे, पहा कसे भूवर येती ! ॥ ४ ॥
तेविं संपदा प्राप्त जाहल्या, विनय शोभवी तिजलागीं ! ।
म्हणुनि सर्वदा त्यासच धरणें, मान्य रीत सकलांस जगीं ॥ ५ ॥
सेवकांशिंहीं प्रेमळ वर्तन, तुझें सर्वदा राहूं दे ! ।
मालकीण निज प्रिय त्या व्हावी, अशीच वाणी येऊं दे ! ॥ ६ ॥

यापरि सकला तोषिव आपुल्या, गोडनम्रशा बोलानें !।
तरिच जगीं या सुकीर्ति गातिल, जन सगळे हे सन्मानें ! ॥७॥

---

६६

## ( १० ) भगिनी.

१०७०
काव्य



चाल- ( अंजनीगीताची- )

बंधुभगिनिचें नातें जगतीं । प्रसिद्ध आहे, ठेवुनि चित्तीं ।
खरें खरें जी वागे सुमती । तीच खरी ताई ! ॥ध्रु०॥
भाऊ येतां निज गेहाला । द्रव्यमदानें न पुसे त्याला ।
गर्वानें जिस ताठा भरला ! । ती कसली ताई ? ॥ १ ॥
गरिब बंधुला टोंचुनि बोले । अपमानाचे भोंसकि भाले ! ।
' नको जीव ' त्यालागीं केलें ! । ती कसली ताई ? ॥ २ ॥

' जोंवरि चाले मोठा धंदा । तोंवरि भगिनी म्हणते दादा ' ।
व्यवहाराची या जिस बाधा ! । ती कसली ताई ? ॥ ३ ॥
प्रसिद्ध सण तो भाऊबिजेचा ! । भगिनीलागीं बहु हर्षाचा ! ।
वास न दावी परि स्वार्थाचा । तीच खरी ताई ! ॥ ४ ॥
भावासाठीं वाट पाहाते ! । प्रेमानें त्या स्वागत करिते ! ।
क्षुद्रभेद जी विसरुनि जाते ! । तीच खरी ताई ! ॥ ५ ॥
घालुनि मंगलस्नान तयाला । फराळ सुंदर देते त्याला ! ।
प्रेमासाठीं जीव भुकेला ! । तीच खरी ताई ! ॥ ६ ॥
दीप उजळुनी सायंकाळीं । गाजवीतसे ती दीपावलि ।
भावासंगें हर्षित झाली ! । तीच खरी ताई ! ॥ ७ ॥
नीरांजन मग तबकीं घेई ! । अंजन ज्या स्वार्थाचें नाहीं ! ।
प्रेमघृतानें भरिलें पाहीं ! । तीच खरी ताई ! ॥ ८ ॥
दिव्य ज्योत मग ती उजळीली ! । तिजभवतालीं प्रभा फांकली ! ।
क्षुद्रवृत्तिची काजळि फिटली ! । तीच खरी ताई ! ॥ ९ ॥
दीप घेउनीं मग हातांत ! । निजभावासी कुंकुम लावित ।
एकच आपण, जणुं दाखवित ! । तीच खरी ताई ! ॥ १० ॥
फिरवुनि दीपा त्याच्या वरुनी ! । जीव टाकि जणुं ओवाळूनी ! ।
उच्च अर्थ हा घेई ध्यानीं । तीच खरी ताई ! ॥ ११ ॥
कोण किती ओवाळणि घाली । इकडे वृत्ती नाहीं गुतलीं ।
प्रेमें सर्वां समान झाली ! । तीच खरी ताई ! ॥ १२ ॥
' दिव्य प्रेम बाजारी नसतें । देणें घेणें त्या नच रुचतें ।
आहे जिस हें ठाउक नातें । तीच खरी ताई ! ॥ १३ ॥
यापरि वागे भगिनी, पुढतीं । तरि कीर्तीची होइल प्राप्ती ।
तव बंधू मग मोदें वदती । ' तूंच खरी ताई ! ' ॥ १४ ॥

—o—

# ( ११ ) सासू.



**चाल-** ( काय पाप केलें म्हणुनी स्त्रि हा जन्म आला. )

काय पाप केलें म्हणुनी, छाळतसा सुनेला ? ।
सासुबाई सांगा कैसे कठिणहृदय झाला ? ॥ धृ ॥
नित्य नवी छळणा तुम्ही, गरिब जिवा देतां !।
राक्षसीपणाची भूक, भागवुनी घेता ।
किती होइ छळ हा, कैसा पाहसी दयाळा ! ॥ १ ॥
डागणोंचि सर्वांगाला, ताडणें तसें तें ! ।
सर्व दिवस कष्टा करुनी, तिळ न श्रेय तीतें ! ।
हाय हाय ! कुठुनी आलें भाग्य भोगण्याला ! ॥ २ ॥
शिळें अन्न तिजसी देतां; नित्य खावयाला ! ।

तेंहि पोट भरुनी न मिळे, पडति उपासांला ! ।
कधीं अंत होइल न कळे, हालअपेष्टांला !॥ ३ ॥
घालुनिया पाडूनिया, बोलतां तिला हो ।
' जीव नको ' तिजसी करितां, तिळ न सौख्यलाहो ! ।
काय म्हणुनि वंचित करिता, तिजसि त्या सुखाला ? ॥ ४ ॥
लग्नसमयिं " मुलगी माना, आपुली तुम्ही ही ।"
वदुनि वाणि विनयें ऐशी, दिधलि काय नाहीं ? ।
मातृपितृहृदयें मुलगी, आपुली तुम्हाला ! ॥ ५ ॥
दुःख तया मातापितरां, काय म्हणुनि देतां ? ।
काय तुम्हा केलें कमती, म्हणुनि सूड घेतां ? ।
काढितांच वांग्यावरतीं वड्यावरिल तेला ! ॥ ६ ॥
हीच रीत वागविण्याची, जगीं थोर काय ? ।
याच परी निज कन्येला, वागवाल काय ? ।
कां न घेत मग तो मार्ग, जाइ जो सुखाला ? ॥ ७ ॥
काय म्हणुनि सासूबाई, भेद जगिं करावा ? ।
आपुलिया जीवावरुनी, जीव ओळखावा ! ।
कसें आजि विसरुनि गेला दिव्य या वचाला ? ॥ ८ ॥
काय तुम्ही नव्हता सून, या जगीं कधींही ? ।
स्वानुभवें तुम्हा सगळें, काय कळत नाहीं ? ।
आठवाच क्षणभर तरिही, आपुलिया हाला ! ॥ ९ ॥
सोडुनिया द्यावें तुम्ही, या पुढें छळाला ।
गोड वाणिनें लावावी, रीत निज सुनेला ! ।
कार्य अमित होई जरि हा शब्द गोड आला ! ॥ १० ॥
हीच रीत अनसूयेची, मान्य सर्व लोका ।
तीच तुम्ही अनुसरण्यासी, करा आणभाका ।
सौख्य खरें यांतच, न धरा मनीं संशयाला ! ॥ ११ ॥

तरिच नांव होइल तुमचें, निश्चयें जगीं या ! ।
म्हणुनि विनाति तुम्हा करितों, वंदुनिया पाया ! ।
मान्य करा हृदयीं धरुनी, या गरीब बोला ! ।। १२ ।।

---

## ( १२ ) नणंद.

चालः—( मांडिला काय हा निजकन्येच्या० )

मांडिला कसा हा निजबंधूच्या, भार्येचा छळवाद ।। ध्रु० ।।

काय दिधली याचसाठीं ? । म्हणुनि छळणा तिच्यापाठीं ! ।
तुम्हि रोज लाविली मातेसह निज, दावुनिया हितवाद ! ।। १ ।।

नित्य चुगल्या आइपाशीं । करूनि देतां दुःखराशी ! ।
घालुनी पाडुनी बोलतसा तिज, किति तुम्हा उन्माद ! ।।२।।

काय तुम्हा नसाति ठावी ? । कधीं नव्हती स्नुषापदवी ? ।
कां उगाच छळिता वदा मला हो ? गरिब जीव जगतांत ! ।।३।।

कोणि नाही साह्य तिजला । परगृहीं हा जीव पडला ! ।
म्हणुनिया राक्षसी सूड घेउनी, करिता निज मन शांत ! ।।४।।

परि न मुळिं हें योग्य देखा ! । मान्य नाहीं थोर लोका ।
ते सदा निंदिती अशा छळाला, घ्यावें हें ध्यानांत! ।। ५ ।।

आपणासीं दुःख दिधलें । चित्त तेणें कष्टि झालें ।
'आपणावरूनिया जगा ओळखी' तोच मान्य थोरांत ! ।। ६ ।।

म्हणुनि तुम्हा विनाति करितों । पदर तुम्हा पुढति धरितों ! ।
"तिज सौख्य यापुढें देऊं" ऐशी वाढा भीक तयांत ! ।।७।।

---

# ( १३ ) जाऊ.

चाल—( बाळा जोजोरे० )

जावांनों, तुम्ही । ऐकावें । बोल मनीं हे घ्यावें ! ॥ ध्रु० ॥
आनंदे नांदा । सौख्यभरें । तैशा एक विचारें ! ॥ १ ॥
परस्परें प्रेम । राहूं द्या । कलह न कधिं होऊं द्या ! ॥ २ ॥
परगृहिंवास तुम्हा । हा आला । एकच सासु तुम्हाला ॥३॥
व्हा तुम्ही प्रथम । तरबेज । करुनिया निजकाज ॥ ४ ॥
सासू तुम्हांला । शिकवीते । ध्यानीं घ्या हें पुरतें ! ॥ ५ ॥
त्यांतच कल्याण । होईल । मंगल मार्ग दिसेल ! ॥ ६ ॥
एकीनें वागा । सर्वजणी । मिळेल मग सुखखाणी ! ॥ ७ ॥
बेकीनें राज्यें । बुडतात । रामदास हें वदत ! ॥ ८ ॥
ठेवुनिया चित्तीं । हा बोध । वागा तैसें सतत ॥ ९ ॥
सांगु नका चुगल्या । सासूला । तैशा त्या निजपतिला ! ॥ १० ॥
बेकीचें भूत । नच उठवा । होइल नाशच अवघा ! ॥ ११ ॥
एकामेकांचा । दुस्स्वास । करणें वाइट खास ! ॥ १२ ॥
जाणुनि हें पुरतें । वागावें । निजसुख मग भोगावें ! ॥ १३ ॥

---

# ( १४ ) मैत्रीण.

चालः—( रामचंद्र नाहि घरीं० )

जरुर तुम्हा निज सखिची, वाटते खरी ।
पारखुनी परि मैत्री, राखणें बरी ! ॥ध्रु० ॥
सुखदुःखा निज वदण्या, जीव हावरा । !
म्हणुनि दिसे तिस वदणें, मार्ग नच बरा ! ।
कुलशीला पाहुनिया, सख्य तें करा ! ।
निज मैत्रीवरुनि ठरे, योग्यता खरी ! ॥ १ ॥

सज्जनाशिं संगत ती, सज्जनचि करी ।
दुर्जन तो दुर्जनासिं, सख्य निज वरी ।
शीलव्यसन जमलें जर, मैत्रि हो तरी ।
नियम असा, थोरांची वदत वैखरी ! ॥ २ ॥
सज्जनाशिं समय पडे, होइ छान बात ! ।
गद्धयाच्या संगतींत, बसत खास लाथ ! ।
वचन पुरें दृढ ठेवा, आपुल्या मनांत ।
वागा मग सतत तुम्ही, धरुनि त्या तरी ! ॥ ३ ॥
अवगुणास सन्मैत्री, करितसे गुण ! ।
सद्गुणास दुर्मैत्री, बनवि अवगुण ! ।
संसर्गें सर्व दशा, ओळखा खुण ! ।
उच्च नीच राहतसे, पदवि त्यावरी ! ॥ ४ ॥
घन सागरजल पिउनी, करित गोड तें ! ।
पुष्पसंग मधुर वास, देइ मातितें ! ।
सर्प दुग्ध प्राशुनिया, वमित गरल तें ! ।
संगतिची महति ठसे निज हृदंतरीं ! ॥ ५ ॥
भगिनीनो ! शेवटची, करित प्रार्थना ! ।
संगतिवर अवलंबुनि, सर्व वासना ! ।
म्हणुनि जपुनि संगतिला, स्थान द्या मना ।
नातरि मग नाश किती, होई हा तरी ! ॥ ६ ॥

---

## ( १५ ) खरा मित्र !

**चाल**– ( कशी जाऊं मी कुंजवना० )

सखी जिवाची तुम्हा असे ।
प्रपंचसागर प्रचंड म्हणुनी, जरूर सखिची सदा दिसे ! ॥ ध्रु० ॥

परंतु पति हा सखा खरा ! ।
तुम्हास दैवें असे मिळाला, म्हणोनि त्यातें सदा धरा ॥ १ ॥
मिळोनि मन त्यासवें रहा ! ।
तयास हितगुज वदा मनींचें, मिळेल सुख मग सदा पहा ! ॥२॥
भवांत भय हें असें किती ।
भवास देण्या, करीं तुम्हाला धरी पती ! ॥ ३ ॥
अथांग मायानदी असे ! ।
तरोनि जाण्या परी तियेला, सहाय पतिविण कुणी नसे ! ॥ ४॥
म्हणोनि पति हा सखा करा! ।
हरोनि दुःखें, सुखें तुम्हीं मग, प्रपंच अवघा झणीं तरा ! ॥ ५॥

## ( १६ ) टापटीप, दक्षता व स्वच्छता !



चाल– ( रामनाम खेळ आम्हि मांडू० )

निज प्रपंच सुंदर सजवी !। त्यामुळें धन्यतापदवी ! ॥ध्रु०॥

प्रभातकालीं प्रथम उठोनी !।
आळस सगळा तो झाडोनी !।
तुळशीस प्रथम वंदावी !। त्यामुळें धन्यता पदवी ! ॥ १ ॥

लक्ष ठेवुनी सर्व बाजुला !।
नेमुनि जागा देइ वस्तुला !।
नच कधीं तयाना हरवी !। त्यामुळें० ॥ २ ॥

वक्तशीर तीं कामें करितां ।
उल्लासाचा भर ये चित्ता !।
आलस्य मुळीं नच उरवी !। त्यामुळें० ॥ ३ ॥

आळस सकला नागवीतसे ।
प्रपंच अवघा तो बुडवितसे !।
म्हणुनि त्या सोडुनी देई !॥ त्यामुळें० ॥ ४ ॥

टापटीप दक्षता चहुंकडे !।
जणुं शोभेचें मंदिर उघडें !।
पाहुनी नयन जें निववी !। त्यामुळें० ॥ ५ ॥

स्वच्छपणाची आवड भारी !।
करुनि सडासंमार्जन द्वारीं !।
रांगोळि काढि ती बरवी !। त्यामुळें० ॥ ६ ॥

झाडुनि झटकुनि वस्तुस ठेवी !।
लेशमात्रही केर न उरवी !।
वैभवा आणुनी बसवी !। त्यामुळें० ॥ ७ ॥

वेणिफणी ती सुंदर करुनी !।
मस्तकावरी पदर घेउनी !।
गमनांतहि शोभा दावी !। त्यामुळें० ॥ ८ ॥

यापरि वागा प्रिय भगिनींनो !।
जग सगळें हें तुम्हास वानो !।
ही विनंति मम ऐकावी !। त्यामुळें० ॥ ९ ॥

—०—

## ( १७ ) ज्ञानमार्ग व वेळेचा सदुपयोग!

चाल—( तिळगुळ घ्या मंजुळ बोला० )

हा मार्ग त्रिविध ज्ञानाचा !।
बघण्याचा, श्रवणाचा । वाचुनिया अभ्यासाचा !॥ध्रु०॥
यांतिल साधें तितुकें मिळवा !।
क्षण न व्यर्थही जाऊं द्यावा !।
आयुष्याचा नाश न बरवा !।
नरजन्म पुन्हा नच साचा !॥ १ ॥
आळस अपुला वैरी जाणा !।
व्यर्थ चकाट्या पिटणें नाना !।
जननिंदेनें दूषित रसना !।
करुनि कां लाभ व्हायाचा ? ॥ २ ॥
सोडुनि द्यावें सर्व तुम्ही हें !।
ज्ञानमार्गिं लागा लवलाहें !।
पळपळ जाई जीवित पाहे !।
गतक्षण न पुन्हा यायाचा ! ॥ ३ ॥
बाळपणीं अज्ञान खेळ ते !।
वृद्धपणीं निजशक्ती गळते !।
निद्रा जीवित अर्धं खाते !।
हो त्रास कितिक रोगांचा ! ॥ ४ ॥

ग्रंथ संग्रहालय
प्र. क्र. ४२५३
शाखा

उपाधिंतुनि या राहुनि जागे ! ।
ज्ञानपथीं लागावें वेगें ! ।
अल्प आयु निजहातीं लागे ! ।
तुम्हि करा योग्य व्यय त्याचा ! ॥ ५ ॥
विनति शेवटीं तुम्हा भगिनिना ! ।
पूर्णपणें मज द्या अवधाना ! ।
उद्योगाचा धरुनी बाणा ।
घ्या लाभ ज्ञानमार्गाचा ! ॥ ६ ॥
गार्गि मैत्रेयी द्रौपदि कुंती ! ।
सीतादमयंत्यादिक सुमती ! ।
मंडणभार्या देवि भारती ! ।
किति कीर्तिदुंदुभी त्यांचा ! ॥ ७ ॥
त्यांच्यासम तुम्हि ज्ञानपंडिता ।
होउनि, व्हावे ललाम जगता !।
निज देशासी भूषणभूता ।
गाजुं द्या घोष नांवाचा ! ॥ ८ ॥

## ( १८ ) व्रतें, वैकल्यें व दानधर्म !

चालः—(रामा मजला माहीत नव्हतें० )

किति व्रतवैकल्यानें तव गे ! । देह झिजे हा भगिनी ! ॥ ध्रु० ॥
उपवासाला नित्य करीशी !।
तिळ, तांदुळ, तूप किति जाळीशी ! ।
लक्षावधि उजळोनी ! । लावीशी वाती व्रत घेवोनी ! ॥ देह० ॥१॥
ब्राह्मणभोजन किति घालीशी ! ।
हरिदासांची चंगळ करिशी !।
दशहारीं अर्पूनी ! । धनवस्त्रादिक बहु भक्तीनीं ! ॥ देह० ॥ २ ॥

ऐश्वर्याच्या बघ या चाली ।
शोभति केवळ वैभवकालीं !।
सांप्रत स्थिति जाणोनी !। त्यासम वागे बदल करोनी ! ॥देह० ॥३॥
कोट्यावधि जन मरति उपाशी !।
जाळीशी कां मग व्यर्थ तुपाशी ?।
गरिबा तें देवोनी !। करि संतोषित तो वरदानी ! ॥ देह० ॥ ४ ॥
रंजूनि गांजूनि कितिजन गेले !।
मदतीसाठीं फार भुकेले !।
त्यांतें साह्य करोनी !। लावी कर निज देशोद्धरणीं ! ॥ देह० ॥५॥
वणवण करिती किति माधुकरी !।
विद्येसाठीं झटती भारी ! ।
त्यांतें हृदयीं धरोनी !। आनंदवि, तीं दुःखें हरुनी ! ॥देह० ॥६॥
जाणूनि देशा, काला, पात्रा ।
दे दान, तेणें कीर्ती पवित्रा !।
जाईल गे तूज मिळुनी !। वानीति जन मग अवघे भुवनीं ! ॥ ७ ॥

---

## ( १९ ) ईश्वरभक्ती.

चाल—( झिम्मा खेळूं ये० )

हरी गाऊं या !। हरी ध्याऊं या !।
हरीनामें सर्वजणी, ताल धरूं या ! ॥ ध्रु० ॥
भवामध्यें दुःखराशी । शरण जावें त्या देवासी !।
तोची एक वारी त्यासी । म्हणुनी गाऊं या ! ॥ १ ॥
नाम त्याचें बहु गोड !। पुरवी मनिचें सर्वहि कोड !।
दूरी करण्या दुःखें द्वाड । हरी गाऊं या ! ॥ २ ॥
सुंदर किति तें ध्यान हरीचें !। वर्णुनि वेदाहि शिणले वाचें ।
ऐशा दिव्य प्रभूलागीं । हृदयीं ठेवूं या ! ॥ ३ ॥



चित्तामध्यें रोप रुजावें । हरिभक्तीचें मूळ धरावें ! ।
प्रेमाचें खतपाणी त्यातें । आपण घालूं या ! ॥ ४ ॥
कोणी कितिही ठेवुत नांवें । लक्ष न तिकडे तिळभर द्यावें! ।
जन्माचें निज सार्थक होण्या । हरी गाऊं या ! ॥ ५ ॥

## ( २० )भूतदया.

चाल—( मन करूनि विमल० )

मन करूनी विमल, तुम्हि आइका ! ।
गरिब जीव किति जगतीं असती, कोणि न त्यांतें ओळखा ! ॥ध्रु० ॥
त्यांच्या मदतिस धावुनि जावें । घेउनि संगें तो रुका ! ॥ १ ॥
हाच मार्ग भव तरुनी जाण्या । भूतदयेचा भाविका ! ॥ २ ॥
दयाशील जात्याच आहा हो ! । कितीतरी तुम्हि बायका ! ॥ ३ ॥
लक्ष देउनी ऐका तर मग ! । दीनजनांच्या या हाका ! ॥ ४ ॥
दीना रक्षिल संत तरी तो । वाणि वदतसे तो तुका ! ॥ ५ ॥
त्यापरि वागा तुम्ही सयांनो ! । करितिल जन हे कौतुका ! ॥ ६ ॥

## ( २१ ) हुंडा [ मुलीचा. ]

चाल– ( घेउनिया रामा० )

कां हुंडा घेता ? । कन्येला गाईसम विकुनी !। कां हुंडा घेता ? ॥ध्रु०॥
तिळ न सौख्य तिजला ! । काय नको बोला ? ।
मग ऐशी कां करणी ? । गाईसम०॥ १ ॥
द्रव्यलोभ धरिता ! । विवेकही त्यजिता ! ।
अवनतिची ही खाणी ! । गाईसम० ॥ २ ॥
वृद्धवरा दिधली । पिकली ही पोळी ।
परि मुलगी रडवोनी ! । गाईसम० ॥ ३ ॥
भाग्य तिचें फुटतां । कालवतें चित्ता !।
धाय रडे मोकलुनी ! ॥ गाईसम० ॥ ४ ॥
सवतींवर देतां ! । धनराशी घेता ।
परि मुलिचें सुख त्यजुनी । गाईसम० ॥ ५ ॥

गुण न तिळहि ज्याला । ऐशा कु–वराला ।
तिज देता द्रव्यांनीं ! । गाईसम० ॥ ६ ॥
नाहिं द्रव्य तुमतें । म्हणुनि मनीं येतें ? ।
मृत्यु बरा त्याहूनी ! । गाईसम० ॥ ७ ॥
विनति तुम्हा भगिनी ! । जोडुनिया पाणी ! ।
हुंडा द्या हकलोनी ! । गाईसम० ॥ ८ ॥

## ( २२ ) हुंडा [ मुलाचा ]

चाल—( भक्ति ग वेणी० )

हुंडा घ्यावा ! । हा मार्ग नसे हो बरवा ! ॥ध्रु० ॥
वधुपक्षाला पिळुनि काढणें ! ।
हाय ! हाय ! मग त्यांनीं करणें ! ।
सोय न त्यांची मुळिही बघणें ! ।
असा हा कावा । कां करिता मज सांगावा ? ॥ १ ॥
काय तुम्हाला नसती कन्या ? ।
उगाच छळिता कां मग अन्या ? ।
स्वतास मानुनि त्यांतच धन्या ।
असा हा दावा । कां करितां ? कारण दावा ! ॥ २ ॥
दुसरे घेती म्हणुनी आपण ।
हुंडा घ्यावा, जरि हें कारण ।
तरि मग यांतुनि सुटका कवण ।
करिल रे देवा ? । थोरानिं मार्ग दावावा ! ॥ ३ ॥
साधुसंत ते सांगुनि गेलें ! ।
हुंडा घेणें वाइट ठरलें ! ।

लोभ—भूत परि पाठिं लागलें !।
म्हणोनी आडवा । हा मार्ग सरळ कां व्हावा ! ॥ ४ ॥
राक्षसीण हुंड्याची सकला ! ।
छळिते पाही, समाज गिळिला ! ।
गरिब तिजमुळें धुळीस मिळला ! ।
परी नच परवा ! । कोणासिच त्याची देवा ! ॥ ५ ॥
वरमाये ! तुज विनती करितों ।
हस्त जोडुनी तुज प्रार्थीतों ।
' सोडुनि दे हा हुंडा ' वदतों ।
करि न कांगावा । तुजवीण कोण करि केवा ? ॥ ६ ॥
भगवंतासीं प्रिय जें होई ।
तेंच करावें आपण बाई ! ।
कीर्ति तयानें जगतीं होई ! ।
अक्षय मेवा । प्रभुपदीं मिळे मग बरवा ! ॥ ७ ॥
एकामेका साह्य करावें ! ।
जीवालागीं जीव मिळावें !।
लग्न निमित्तें ऐक्यच व्हावें ! ।
' सोयरे ' नांवा । सत्यार्थ तुम्ही आणावा ! ॥ ८ ॥
गरिबालागीं हातिं धरावें !।
श्रीमंतांनीं साह्य करावें ! ।
हेंच प्रभूला प्रिय जाणावें ! ।
म्हणुनिच ठेवा ! । लग्नाचा दिधला बरवा ! ॥ ९ ॥
चित्तिं ठेवुनी तत्व तुम्ही हें ।
वागावें, मम विनती आहे ।
मान्य करावी ती वरमाये ! ।
याहुनि बरवा । मी बोल काय बोलावा ? ॥ १० ॥

———

## ( २३ ) लग्नांतलीं भांडणें.

चालः--( दत्त गुरुला० )

काय म्हणुनी कलह करिता ? ।
क्षुद्रवृत्तिला मनीं धरोनी । एकामेकासवें भांडता ! ॥ ध्रु० ॥
मानपान जरि कमी जाहलें । तरि गाठोडें काय बुडालें ? ।
चुकुनि होय, तें क्षमा न करितां ! ॥ काय म्हणुनी० ॥ १ ॥
ऐक्यासाठीं लग्नबंधन । परि जन्मवरीं पुरण्या भांडण ! ।
कलहबीज या समयिं पेरिता ! ॥ काय म्हणुनी० ॥ २ ॥
रुसणें, फुगणें पोरासम तें ! । अपशद्बांची वृष्टी होते ! ।
सुंदर वदना कलंक आणिता ! ॥ काय म्हणुनी० ॥ ३ ॥
बायांनो ! तुम्हांस प्रार्थना । वरमाये ! तुज तशी याचना ।
सोडुनि द्या हें भांडण आतां ! ॥ काय म्हणुनी० ॥ ४ ॥
उदात्तहृदयें जगीं रहावें ! । थोर अल्प अन्याय क्षमावे ! ।
तरीच कीर्ती गाइल जनता ! ॥ काय म्हणुनी० ॥ ५ ॥

---

## ( २४ ) प्रीतिविवाह !

चालः--( भक्ति ग वेणी० )

प्रीतिनें होई ! । तें लग्न खरोखर बाई ! ॥ ध्रु० ॥
ऐकुनियां श्रीकृष्णगुणांला ।
भुलुनि जीव रुक्मिणिचा गेला ! ।
धाडितसे ती त्या पत्राला ।
" घेउनि जाई ! " ॥ तें लग्न० ॥ १ ॥
श्रवणीं नळराजस्तुति येतां ।
हंसानें ती कथिता वार्ता ।

दमयंतीचा जीव तत्वता ।
जडला पायीं ! ॥ तें लग्न० ॥ २ ॥
सावित्री करि पतिची निवड ।
रूपगुणांची पाहुनि जोड ।
प्रेम गोड किति राहे सुदृढ ।
जिंकित यमही ! ॥ तें लग्न० ॥ ३ ॥
अर्जुनावरी प्रेम सुभद्रा ।
करी, कळेना त्या बळिभद्रा ! ।
म्हणुनी संन्याशाची मुद्रा ।
अर्जुन घेई ! ॥ तें लग्न० ॥ ४ ॥
यापरि झाले प्रेमविवाह ।
गेलें पूर्वीचें तें वैभव ! ।
म्हणुनि भोगणें आता रौरव ।
नशिबीं येई ! ॥ ते लग्न० ॥ ५ ॥
पुनरपि प्रेमें विवाह व्हावें ।
आइबापांना संमत रहावें ।
दिव्य सौख्य तें मग भोगावें ।
विनति ऐकावी ! ॥ तें लग्न० ॥ ६ ॥

---

## ( २५ ) प्रौढविवाह.

चाल— ( पंढरपुरासि जाते० )

प्रौढाविवाह करणें उचित । भगिनींनो, सौख्य मग होत ! ॥धृ॥
‘ बाला षोडशवर्षा ’ वदती । हेतु थोर किति त्यांत ! ॥ १ ॥
पूर्ण वाढ शरिराची व्हावी । वैद्यशास्त्रिं हा हेत ! ॥ २ ॥
अपूर्ण वाढिंत गर्भधारणा । नाशासी तरि नेत ! ॥ ३ ॥

चतुर्थिकरणात्मक जो विधि तो । अशक्यही बाल्यांत ॥ ४ ॥
शिक्षण होणें पूर्ण मुलींचें । सुलभ त्यामुळें जात ! ॥ ५ ॥
बाळपणींचें वय खेळाचें । ठेवा हें हृदयांत ! ॥ ६ ॥
पूर्ण उमलल्याविना कळी ती !। देवा कुणि नच देत !॥ ७ ॥
पक्क पूर्ण फल झाल्यावरि मग । विक्रय होइ पणांत ! ॥ ८ ॥
जाणतसा या व्यवहाराला ! । लग्नंच कां मग हट्ट ? ॥ ९ ॥
यास्तव विनती प्रौढविवाहीं । सर्व भगिनिनां येथ ! ॥ १० ॥
प्रौढ करुनिया निज कन्येला । द्यावी मग लग्नांत ! ॥ ११ ॥
प्रौढ सुशिक्षित बाला मग ती ! । सकलांसी सुख देत ! ॥१२॥
बळकट बाळें प्रसवुनि प्रौढा ! । देश उद्धरिल सत्य ! ॥ १३ ॥

---

## ( २६ ) विधवा.



चाल– ( चंद्रकांत राजाची० )

रम्योद्यानीं निर्झरकाठीं स्फटिकशिलेवरतीं ! ।
दिव्य बैसली सौंदर्याची, करुणेची मूर्ती ! ॥ १ ॥
तरुण मनोहर बाला खेळे निर्झरनीराशीं ! ।
कोमलहस्तांतिल त्या तैशा सुमनसगुच्छाशीं ! ॥ २ ॥
सुमंदमारुतलहरी क्रीडति सुरम्यवसनाशीं ! ।
भ्रमरभ्रमकर कुरलकुरलशा केशकलापाशीं ! ॥ ३ ॥
हाय ! अनाथा बाला होती जी तेथें बसली ! ।
दुर्दैवानें संसारांतील सौख्या जी मुकली ! ॥ ४ ॥
उणीं पुरीं तिज षोडश वर्षें नच झालीं देवा ! ।
तोंचि तिजवरी वैधव्याचा घाला कां यावा ! ॥ ५ ॥
कंठावें ना आयु सकल तें मोहपूर्ण जगतीं ? ।
सौख्यकल्पना आजवरि जिला ठावीही नव्हती ! ॥ ६ ॥
एक पत्नि मृत होय, तरि दुजी करण्या नच दोष ! ।
अन्यपतीतें वरिल्या देवा ! व्हावा ना रोष ? ॥ ७ ॥
सुग्रासान्नीं तृप्त तयातें पुनरपि तें द्यावें ! ।
ठावें नच परि सौख्यलेश त्या क्षुधार्त मारावें ! ॥ ८ ॥
कवण असे बा ! निष्ठुर रीती देवा ! ही जगतीं ? ।
मान्य न होइल कधीं तुला ती, तूं करुणामूर्ती ! ॥९॥
नष्ट मृत प्रव्रजित क्लीब वा पतित जरी होई ।
दुर्दैवानें पति स्त्रियेचा, दोष न तिज कांहीं– ॥ १०॥
अन्य पतीतें वरिल्या, ऐसें पराशरहि वदले ।
कारुण्यानें, वात्सल्यानें सदैव जे भरले ! ॥ ११ ॥
परि न कोणिही लक्ष देतसे, तिळ न त्यास पाहे ! ।
'कलिमाजीं ती पराशरस्मृती' जरि हें वच आहे ! ॥ १२ ॥

उलट छळिति किति विधवा म्हणुनी, टोचुनियां वदती ।
'नको जीव' तिज करुनि सोडिती, किति निष्ठुर रीती !॥१३॥
अनाथासि जो हृदयीं धरितो, साह्य पूर्ण करितो ।
साधु तोचि हो, देव तोचि हो, मान्य जगीं होतो! ॥१४॥
रंजुनि गांजुनि गेले त्यातें अपुले जे म्हणती ।
नवनीतासम सबाह्य कोमल संतमनें असतीं ! ॥ १५ ॥
म्हणुनि भगिनिनो ! विनंति तुम्हा नम्रपणें करितों ।
' सदयहृदय व्हा विधवेलागीं,' करजोडुनि वदतों ! ॥१६॥

---

## ( २७ ) शिक्षण ( संवाद )

चाल:--( श्रीमंत पतीची० ).

**तारा--** शिक्षणासि पुण्यग्रामीं । जातसे सखे गे आजि मी ! ।
विख्यात पुण्यनगरी ती । मढवील मला ती पुरती ! ।
बहु शाला बहु मैत्रीणी । जाईल जीव हर्षोनी ! ।

**शांता—** तूं घेई उत्तम विद्या ।
जी असे सदा अनवद्या ।
परि शिवे न नकली मद्या ।
चवचालपणाच्या, तारे ! । तरि खरेंच शिक्षण सारें !॥१॥

**तारा--** चवचालपणाच्या गोष्टी । सांगुनी साफ करि दृष्टी ।
मी होइन गे उतराई । जरि कथिशी मला नवलाई ।
मैत्रीण जिवाची होसी । म्हणुनिया सांग तूं मजशीं ।

**शांता—** तिरपाच भांग काढावा ! ।
पदर तो गळोनी जावा ! ।
परि भान न त्याचें जावा ! ।
बहु अशा असति गे चाली!। फॅशनच्या नांवाखालीं ! ॥२॥

तारा— अजुनिया सांग मज कांहीं । आश्चर्य वाटतें बाई ! ।
ऐकुनी एक नवलाई । जीव हा उडोनी जाई ! ।
शांता— नाटकी ग्रंथ वाचावे ! ।
नाटकींच गाणें गावें ! ।
पुरुषांत सदा मिसळावें ! ।
ही हौस जिवाची भारी ! । समजेल तिथें तुज सारी ! ॥३॥
तारा— अजुनिया असें कां शांते?। ज्ञाणें सांग मला तूं पुरतें! ।
आश्चर्य, खेद बहु वाटे । हें शरीर पुलकित होतें ! ।
शांता— वळवळूनि मुरडुनि बघणें ! ।
रस्त्यांत खिदिखिदि हसणें !।
मर्यादा सोडुनि जाणें ! ।
धर्माची तिळहि न आस्था !। परमार्थ स्वार्थ ना पुरता!॥४॥
तारा— स्त्रीपणा स्त्रियांचा जाई !। धिःक्कार शिक्षणा त्याहीं ! ।
मज नको असें तें बाई ! । मी कधीं न त्यातें घेई ! ।
शांता— परि तारे सर्व न ऐशा ।
चवचालपणाच्या पाशा– ।
गोंवुनी पावती नाशा ।
कितिएक सद्गुणी बाला !। दिसतील तुला वेल्हाळा ! ॥५ ॥
तारा— तैशीच मीहि होईन । स्वकुलातें धन्य करीन ! ।
वद मजसी सुंदर बोल ! । जेणें मज मार्ग दिसेल ! ।
शांता— मर्यादा नच सोडावी ! ।
सद्ग्रंथीं प्रीति जडावी !।
सन्मैत्री तीहि असावी !।
देवावरी श्रद्धा ठेवी !। धर्माज्ञा मानित जावी !॥ ६ ॥
तारा— मी तशीच गे वागेन । धर्माज्ञा मनिं ठेवीन !।
ही फॅशन मी टाकीन ! । नच कधीं तिला भाळेन ! ।

शांता-- परि अंधपणें नच जाई ! ।
बुद्धीस न विसरा देई !।
दोषासि न बिलगुनि राही ।
'जें जुनें सदा ना सोनें' । सत्य हीं कवीचीं वचनें ! ॥ ७ ॥

तारा--मग काय करूं तें सांगे । निश्चयें एक मज सखये ? ।
निंदिसी नव्या चालीला । तैसेंच जुन्या वळणाला ! ।
संदिग्ध अशा बोलानें । बुद्धीला मोहाचि पडणें ! ।

शांताः-- संदिग्ध न माझे बोल ।
जा जरा आणखी खोल ।
म्हणजेच तुला समजेल- ।
कीं नव्याजुन्यांची ग्रंथी । शोभविते सकला अंतीं !॥ ८ ॥

ताराः-- हा बोध मनाला झाला । हृदयाला माझ्या पटला !।
जें सज्जन संमत झालें । घ्यावें तें सर्वहि वहिलें ! ।
चांगलें कुठुनिही घ्यावें ! । मग भेदा नच पाहावें ! ।

शांताः-- देश, देव, धर्म स्मरावा !।
मनिं सदैव तोच असावा ! ।
मग विद्यामृतरस प्यावा ।
लागेल तसा तितुकाही । नच बाधा कधिंही होई ! ॥ ९ ॥

दोघीः-- तुज विनती श्री गणराजा । ही बुद्धी देइ समाजा ! ।
बहको न कधींही देवा ! । सद्धर्मी त्यातें ठेवा ! ।
पूर्वीचें वैभव त्यातें !।
लाभुनी त्वरित देशातें ! ।
भूषवो सर्व राष्ट्रांतें ! ।
होउनी गुरू जगताचा !। हा भारतवर्षहि साचा ! ॥ १० ॥

---

## ( २८ ) गोरक्षण.



चालः--( उद्धवा शांतवन० )

ही गाय फोडिते टाहो ! । रक्षणा कुणी धांवा हो ! ॥ध्रु०॥
गोपाल कुठें ते गेले । मम हितार्थ बहु जे झटले ? ।
तो शिवबा कोठें आता ? । जो तोडी खाटिक हाता ! ।
ते पाटिलबावा कोठें ? । गोरक्षण करिती नेटे ।
हे सर्व काय कीं गेले ? ।
अश्रूनें डोळे न्हाले ! ।
हें हृदय भरोनी आलें ! ।
हा हाय ! हाय ! रे दैवा !। किति कहर अजी सोसावा ! ॥१॥
पेशवेहि ब्राह्मणशाही । मम रक्षण करिती पाही ।
परि त्यांचे वंशज आजीं । करितात काय सांगा जी ? ।
पोटांत भराया कांटे । दाबितात खाटिक नेटें !।

ही स्थिती जिथें हो तुमची ! ।
इतरांतें दोषूं कैची ? ।
ही रास पुरी पापाची ! ।
फेडाल कुठें सांगाना ? । कां खालीं करितां माना ? ॥ २ ॥
चरचरां चिरीती मजला । खाटिक हे दिवसा ढवळ्या ! ।
वांग्यास कहर उसळोनी । जीव हा उडोनी गेला !।
तिळभरी न येई परिहो । द्रव कैसा त्या दुष्टाला ? ।
' गाईस नसे कीं आत्मा ' ।
तो वदतो नीच दुरात्मा ! ।
परि वरतीं तो परमात्मा ।
पाहतो सर्व हें पाप । देईल पुरोपुर माप ! ॥ ३ ॥
तूं धांव अतां जगदीशा !। गोपाल म्हणविशी कैसा ? ।
गाईच्या रक्षणकार्या । अवतार घेशि तूं सदया ! ।
मग आजच कैशी केली । देवा ! तव पातळ माया ? ।
गोमाता पृथ्वी होई !।
तूं जन्म भूवरी घेई !।
ब्रीद तुझें ऐकूं येई !।
तें खरें करोनी दावा । ऐकुनिया हा मम धांवा ! ॥ ४ ॥
भगिनिनो ! विनंती तुम्हा । ही हांक तुम्ही ऐकावी ! ।
निज तन, मन; धन देवोनी । तिळ लाज तिची राखावी ! ।
गोग्रास देउनी सतत । तिजलागीं मदत करावी ! ।
यापरी स्वता झटतांना ।
धांवेल सत्य प्रभुराणा ! ।
कनवाळू सर्व जिवांना ।
म्हणुनियां प्रार्थना करितों । नच आळस येथ करावा ! ॥ ५ ॥

## ( २९ ) स्वदेशीव्रत.

चालः--( मुद्रिके, सांग कुठें श्रीराम० )

घेई, शपथ स्वदेशी छान ! ॥ ध्रु० ॥
बघ हे लुटिती परके येउनी ! । स्वार्थी जे बेमान ! ॥ १ ॥
मारुनि धंदे येथिल सगळे । निज भर करिती जाण !॥ २ ॥
आजवरि किती झालिस तूंही । देशाशीं बेमान ! ॥ ३ ॥
उठता तुजला चहा लागतो ! । परदेशी ता जाण !॥ ४ ॥
परकी साखर घालुनिया गे । करिशि किती पक्वान्न ! ॥ ५ ॥
राजवर्खि बांगड्या बिलोरी । परक्या हें धनदान ! ॥ ६ ॥
तलम पातळें, चिटें, जाकिटें । परदेशी परिधान ! ॥ ७ ॥
जिवावरी परक्यांच्या यापरि । केलिस किति तूं चैन ! ॥ ८ ॥
यापुढतीं तरि राखावा गे । निज देशाचा मान ! ॥ ९ ॥
मायभूमिची लाज राखण्या ! । शब्द मनीं हे आण ! ॥१०॥
विनंति करितों पुन्हा एकदां । देइ पुरें अवधान ! ॥ ११ ॥
ऐक प्रार्थना भगिनी माझी । स्वदेश मानी प्राण !॥ १२ ॥
नाहिं जगीं या देश एकही । तव देशासि समान !॥ १३ ॥
यास्तव घेई शपथ स्वदेशी । धरुनि पुरा अभिमान !॥ १४ ॥
तुष्ट होउनी देव देइ मग । स्वातंत्र्याचें दान ! ॥ १५ ॥

---

## ( ३० ) देशाभिमान.

चालः--( राधे कृष्ण बोल० )

मायभूमि बोल । भगिनो । मायभूमि बोल। तेणें,हृदयरंगीं डोल!॥ध्रु०॥
मायभूमिवर प्रेम निरंतर । किति भरुनि येत निज अंतर ।
अहा ! दिव्य तें अमोल ! । तेणें हृदयरंगीं डोल !॥ १ ॥



स्वर्गाहुनिही थोरावि ग्वाही । किति देत रामप्रभु पाही !।
धरी प्रेम तें सखोल !। तेणें हृदयरंगीं डोल ! ॥ २ ॥
रामकृष्ण जनकादिस जननी । किति वीररत्न प्रसवोनी !।
भरी कीर्तिनें खगोल !। तेणें हृदयरंगीं डोल ! ॥ ३ ॥

जानकि द्रौपदि पुराणग्रंथीं । रजपूतरमणि किति ख्याती ! ।
जिजा प्रसवि शिव अमोल ! । तेणें० ॥ ४ ॥
हिमगिरि देई गंगालहरी । किति क्षेत्रवास सुखकारी ।
जिथें स्वर्गसौख्य फोल ! । तेणें० ॥ ५ ॥
नाहिं प्रेम देशावर तिळही । नच मानव, पशु तो पाही ! ।
पडे रौरवांत खोल ! । तेणें० ॥ ६ ॥
यास्तव विनती तुजला भगिनी । झणिं होइ देश अभिमानी ।
' वंदे मातरम् ' हि बोल ! । तेणें० ॥ ७ ॥

---

## [ ३१ ] धर्माभिमान.

चाल—( जगिं भक्तासाठीं० )

हा धर्म आपुला प्यार ! । त्या कधीं न सोडुनि देई ! ॥ध्रु॥
रजपूतरमणि धर्मार्थ ।
जोहार कितिक ते करित ।
यश मिळवुनि स्वर्गा जात ।
इतिहास तयांना गाई ! ॥ १ ॥
धर्मार्थ शिवाजी राणा ।
घेउनिया फकिरी बाणा ।
मारितो कितिक शत्रूंना ।
उत्साह जिजाई देई ! ॥ २ ॥
धर्मार्थ शिवाजीबच्चा ।
धैर्याचा मेरू साचा ! ।
देउनी बळी प्राणांचा ।
राखितोचि धर्मा पाही ! ॥ ३ ॥



धर्मार्थ मराठे लढले ! ।
गनिमास खडे चारियले ।

अटकेवर झेंडे नेले ! ।
    किति कीर्ति तयांची होई ! ॥ ४ ॥
धर्मार्थहि झांशीवाली ! ।
रणशूरपणानें लढली ! ।
अबला परि भारी झाली ।
    झगझगुनी अंतीं जाई ! ॥ ५ ॥
धर्मार्थहि साधूसंत !।
किति झटती ते निस्स्वार्थ ! ।
जीवास तृणहि मानीत ।
    उपकार किती तो होई ! ॥ ६ ॥
यापरी कितिक जन गेले ।
धर्मार्थहि जगले मेले ! ।
कीर्तिनें तयांच्या भरलें ।
    अंबर हें अवघें पाहीं ! ॥ ७ ॥
तैशीच वाग तूं भगिनी ।
निजधर्माची अभिमानी ।
जगदंबा माय भवानी ।
    वैकुंठपीठ मग हलवी ! ॥ ८ ॥

---

## ( ३२ ) भाषाभिमान.

चाल--( दिनमणि बघ हा पळ पळ वाढे० )

मातेहुनि योग्यता जियेची, असे निश्चयें अधिकतरा ।
त्या भाषेचा धरोनिया, अभिमान नांव निज सार्थ करा !॥ध्रु०॥
इंग्रजि भाषा शिकला म्हणुनी, मराठिला नच कधिं विसरा ।
वाचुनि अपुलें सुंदर वाङ्मय, मान राखणें मार्ग बरा ! ॥ १ ॥

तुम्हाचसाठीं पहा शिणविली, साधुकवींनीं स्वकिय गिरा ।
' अमृतासिही जिंकिल पैजे' अशी वैखरी हृदयिं धरा ! ॥ २ ॥
ज्ञानदेव किति सुंदर लिहिती, मराठि भाषा पहा जरा ! ॥
ओव्यांचा तो विलास बघुनी; भुलुनि जाइ हा जीव खरा !॥३॥
नामदेवहृदयाची तळमळ, हांक देइ पंढरीवरा ! ।
देउळ फिरलें जधिं आळविलें, तयीं पहा त्या उमावरा ॥ ४ ॥
अभंगवाणी प्रसिद्ध तुकया, गाउनि भेदी खलांतरा ! ।
सुलभ, गोड, किति शब्द चालती, झुळझुळ वाहे जणों झरा !॥५॥
विलासवैभव निजभाषेचें, वामन श्लोकीं पटवि नरा ।
आर्यापति तो पंत गातसे, कथा कितिक रंगुनी पुरा ! ॥ ६ ॥
मुक्ताबाई, जनाबाइ त्या, रचिति अभंगा बहु चतुरा ।
वेणू, अक्का, आदिकरुनिया, हाच मार्ग धरितात खरा !॥ ७ ॥
निंदक निंदिति, छळिति वावदुक, संतसज्जना शांतिवरा ।
परंतु लवहि न मार्ग सोडिला, धरिला जो निश्चयें पुरा !॥ ८ ॥
मराठि गाथा पाहुनि आला, कोप फार त्या ब्रह्मवरा ! ।
'बुडवा तिजला नदींत' वदला, तुकोबास तो अशी गिरा !॥९॥
नदीकांठिं परि ठाण मांडिता, गहिंवर ये रुक्मिणीवरा !।
परत मिळाल्या वह्या कोरड्या, विजयि जाहला वीर खरा!॥१०॥
यापरि झटले उन्नतिसाठीं, निजभाषेच्या पहा जरा ! ।
स्मरण तयांचें सदा असावें, हाच मार्ग हितकारि बरा ! ॥११॥
म्हणुनि भगिनिनो ! विनंति करितों, नच दावावें अनादरा ।
निजभाषेच्या अभिमानाची, भीक घालणें तरी जरा !॥ १२ ॥

## ( ३३ ) अस्पृश्यतानिवारण.

चालः—( सुकुमार गुरूचे० )

अस्पृश्यजनासि न छळणें हो । अस्पृश्यसमाज न छळणें ।
आपुला बंधु तो धरणें, कींवहि करणें हो ॥ अस्पृश्य० ॥ध्रु०॥
किति हीन दीन ते असती । हो । किति० ।
कोट्यावधि संख्या भरती । हो । कोट्या० ।
परधर्मि टपुनि किति बसती !। हो । पर० ।
किति दयाळु गाती गाणें, भुलविति तेणें !। हो० ॥ १ ॥
महारांतहि झाला चोखा ! । हो० । महा० ।
न्हाव्यांतहि सेना देखा ! । हो० । न्हाव्या० ।
तो बंका–राका–डंका ! । हो० । तो बंका० ।
विठु महार होउनि प्रभुनें, निववीलिं सुमनें ! ॥ हो ॥२॥
अस्पृश्य मानणें याचा । हो । अस्पृ० ।
हा कलंक निजधर्माचा ! । हो । हा कलंक० ।
साधुसंता मान्य न साचा !। हो । साधु० ।
किति 'मोहन' करितो लिहिणें, अंतःकरणें !॥ हो ॥ ३ ॥
भगिनिनो ! तुम्हांसी विनती । हो । भगि० ।
कर जोडुनि करितो प्रणती । हो । कर० ।
मागतो भक्ति द्या पुरती ! । हो । माग० ।
अजि सोडून हें रडगाणें । हृदयीं धरणें ! ॥ हो ॥ ४ ॥
व्हा दयाळु अंतःकरणीं !। हो । व्हा० ।
नाथासम दावा करणी । हो । नाथा० ।
महारावरि प्रेम करोनी । हो । महा० ।
निज विचार दावा कृतिनें, धन्याचि तेणें ! ॥ हो ॥ ५ ॥

## ( ३४ ) शुद्धिकरण.

चाल--( दत्तगुरुला शरण० )

शुद्धिकरणा साह्य व्हावें !।
दावुनि आपुलें हृदय उदार। प्रेमबुद्धिनें जवळ करावें!।।शुद्धिकरणा।।ध्रु०।।
चुकुनी, फसुनी, भुलुनी, गेले ।
परधर्मीं जे बंधु आपुले ।
त्यास विधीनें शुद्ध करावें !।। शुद्धि० ।। १ ।।
तळमळती किति बंधू त्यांतिल ।
पश्चात्तापीं हृदयें विकल ! ।
म्हणुनि शुद्ध त्या तुम्हि मानावें ! ।। शुद्धि० ।। २ ।।
दिसंदीस गळती निजधर्मा ।
लागुनि, भरती हो परधर्मा ! ।
आत्मघातकी मार्ग त्यजावे ! ।। शुद्धि० ! ।। ३ ।।
इतिहासांतरिं कितिक दाखले ।
या शुद्धीचे मिळति चांगले ? ।
स्मरण तयांचे सदा असावें ! ।। शुद्धि० ! ।। ४ ।।
याच कारणीं श्रद्धानंद ।
भोगिति सौख्यें स्वर्गानंद ! ।
मसुराश्रमकार्यास पहावें ! ।। शुद्धि० ।। ५ ।।
कुर्तकोटि साह्यास धांवले ! ।
डॉक्टर मुंजे, दिवेकर भले !।
झटति थोर ते किती वदावे ? ।। शुद्धि० ।।६ ।।
शिवप्रभुमाता जिजा सहायी ।
शुद्धिकार्य करण्यासी होई ।
भगिनींनो ! तिजसम वागावें ! ।। शुद्धि० ।। ७ ।।

———

## [ ३५ ] ग्रामसेवा.

चालः—( धिंगाणा हा घालितो० )

ग्रामसेवा होय तरि बाई !। देश वरती येइ मग बाई !॥ ध्रु० ॥

कोट्यावधी लोकगणती ।
खेडोपाडीं करित वसती ।
त्यांचि होतां झरझर प्रगती ।
कार्य होइ बाई ! ॥ ग्रामसेवा० ॥ १ ॥

लक्षावधी खेडिं देशीं ।
ज्यांत मरती जन उपाशी ! ।
ज्ञान नाहीं, आळसहि ग्रासी ।
त्यास पाहि बाई ! ॥ ग्राम० ॥ २ ॥

त्यास व्यसनें विविध जडलीं ! ।
शरिरद्रव्या हानि झाली ! ।
अब्रु तीही सकलहि गेली ।
त्याच पायिं बाई ! ॥ ग्राम० ॥ ३ ॥

नाहिं एकी, कलह नांदे ।
नाचताती त्याच छंदें ! ।
ऐक्य साधा सुमधुर शब्दें ! ।
सौख्यदायिं बाई ! ॥ ग्राम० ॥ ४ ॥

विनाति तुम्हा करित भगिनी !।
लक्ष द्यावें सर्वजाणिनीं ।
होइ कार्य तरि वरदानी ।
राज्य देइ बाई ! ॥ ग्राम० ॥ ५ ॥

———

## [ ३६ ] प्रभुप्रार्थना [ शेवटची ]

चाल:—( अशि काशि हरीजवाळि० )

तुज विनवितों, नमुनि प्रभुराया ! । हरोनि माया, करी दया ! ।
वसोत सौख्यीं सदा स्त्रिया ! ।
दवडुनि अज्ञान, करि त्यासि सज्ञान, विनंति पाया दयामया ! ॥ धु ०॥
आळस ग्रासी, कलहबुद्धी फार हृदयीं त्यांजला ।
द्वेष करिती, मत्सरानें मार्ग त्यांचा रोधिला ।
दूर करुनी सर्व दोषां, दावि पथ तो चांगला ! ।
तरी स्वदेशा, मिळेल सुदशा, हरेल कुदशा सुखनिलया ! ॥१॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

REFBK-0004253
REFBK-0004253
४२५३

स मा प्त.

## ॥ महाराष्ट्रसाहित्यसेवक ग्रंथमाला ॥

नियमः— ( १ ) १ रु. प्रवेश फी भरून कोणासही 'माले'चे कायम वर्गणीदार होतां येतें.

२ कायम वर्गणीदार होणारास ' माले ' चीं सर्व नवीं जुनीं पुस्तकें ¾ किं.स मिळतात. ( ट. ख. निराळा. )

### आजवरचीं आठ पुस्तकें !

| | | | |
|---|---|---|---|
| १ कमला ! ( स्वतंत्र सामाजिक कादंबरी ) | ... | ८१० |
| २ भगवान् श्रीकृष्ण ! ( सचित्र २ री आवृत्ति ) | ... | १८४ |
| ३ अलौकिक आत्मयज्ञ ! व कविसंसार ! ( द्वितीयावृत्ति छापत आहे ) | | |
| ४ लीला ! ( स्वतंत्र सामाजिक कादंबरी ) | ... | १ |
| ५ भारतीय संग्राम ! ( सचित्र २ री आवृत्ति ) | ... | १८४ |
| ६ हिरकणी ! ( सचित्र व स्वतंत्र सा. कादं. ) | ... | १ |
| ७ सायुज्यसोपान ! ( पारमार्थिक चटकदार ग्रंथ ) | ... | २ |
| ८ मुरारि ! (शिवकालीन ऐति. कादंबरी) | ... | २ |
| याशिवाय ( १ ) " मुलांचा मार्गदर्शक " | ... | ८१० |
| ( २ ) " बालवीर अर्थात् धाडसी यशवंत " | ... | ८४ |
| ( ३ ) " बायकांची नवीं गाणीं " (भाग १ ला) | ... | ८८ |

हीं पुस्तकेंही आमचेकडे मिळतील. 'माले'चें पुढील नव्या नवाळीनें नटलेलें नववें पुष्प–"भारतवर्षाचा धार्मिक इतिहास" (पूर्वार्ध) डिसेंबर १९३० च्या प्रारंभीं प्रसिद्ध होईल. किं. २ रु. मालेच्या २, ३, ५, ७, ह्या पुष्पांना व ' मुलांचा मार्गदर्शक ' ह्या पुस्तकास 'डे. व्ह. ट्रा. सोसायटी,' पुणें, व ' मराठी ग्रंथोत्तेजक मंडळ, ' इंदूर, या संस्थांकडून बक्षिसें मिळालीं आहेत व सर्वच पुस्तकांस महाराष्ट्रांतील विद्वानांचे व वृत्तपत्रांचे उत्तमोत्तम अभिप्राय मिळाले आहेत. तरी १ रु. प्रवेश फी भरून आजच 'माले' चे कायम वर्गणीदार व्हा व उच्च वाङ्मयाचें सेवन करा.

"महाराष्ट्रसाहित्यसेवक ग्रंथमाला" ऑफिस, ५३९ सदाशिव, पुणें शहर.

गं. रा. साने, संपादक, महाराष्ट्र सा. सेवक ग्रंथमाला.